# लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये २४ व्या दीक्षांत समारंभाचे आयोजन




श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये २०२२–२३ बॅचचा दीक्षांत समारंभाचे आयोजन केले होते कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालय चे प्राध्यापक डॉ किरण जगताप आणि लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री योगेश गायकवाड यांनी भूषवले कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी

म्हणून सोलापूर जिल्ह्याचे पोलीस उपाधीक्षक श्री अमोल भारती ॲडव्होकेट श्री गजानन भाकरे, लोकमंगल समूहाचे संस्थापक, माजी सहकार मंत्री तसेच दक्षिण सोलापूर मतदारसंघाचे विद्यमान लोकप्रतिनिधी माननीय श्री सुभाष (बापू) देशमुख हे लाभले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमेची पूजन तसेच अतिथींच्या भाषणांनी झाली श्री गजानन भाकरे सरांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्याच्या शुभेच्छा देत स्वतःमधील स्किल डेव्हलप करण्याचा सल्ला दिला आणि यशस्वी कारागीर तसेच उद्योजक होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. श्री अमोल भारती सरांनी विद्यार्थ्यांना आपल्या तडफदार भाषण शैलीमध्ये नीतिशास्त्र आणि सदैव काहीतरी शिकत राहण्यावर भर देणे व स्वतःतील कलागुणांना ओळखण्याचा सल्ला दिला व विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. लोकमंगल समूहाचे आधारस्तंभ माननीय श्री सुभाष बापू देशमुख यांनी उद्योग व उद्योजकते ची स्वप्ने पाहणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना उद्योजक बनण्यासाठी सहकार्य करण्याचे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. त्याचप्रमाणे जर कोणा विद्यार्थ्याला उद्योजक बनण्याची इच्छा असेल तर त्यांनी कृपया संपर्क करावा असे आवाहनही त्यांनी केले. सन १९९९ साली सुरू झालेल्या लोकमंगल आयटीआय मधून आत्तापर्यंत २५०० कुशल प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेऊन विविध शासकीय तसेच खाजगी आस्थापनेमध्ये सेवा देत आहेत तसेच बरेच विद्यार्थी स्वतःचा व्यवसाय देखील करीत आहेत. आज संस्थेचा २४ वा दिक्षांत समारोह उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री योगेश गायकवाड सर यांनी केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्निल मुळे यांनी केले, तसेच आभार प्रदर्शनाचे कार्य डॉ.किरण जगताप सर यांनी केले.




Shriram Gramin Shanshodhan va Vikas Pratishthan's
Lokmangal Industrial Training
Wadala
2023
Ranjeet